http://www.sgbauonline.com/



# Bachelor of Performing Arts (BPA—I) Semester—III Examination

## MARATHI

## (Compulsory Language)

वेळ : तीन तास]  [एकूण गुण : 80

1. यशवंतराव चव्हाण यांना शुद्ध चारित्र्याचा प्रज्ञावंत राजकारणी असे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी का म्हणतात ? ते लिहा.

**किंवा**

'मीपण स्वत्वाच्या सीमेत दरवळतं, तोपर्यंतच ते सुगंधी असतं!' या लेखातील आ.ह. साळुंखे यांचे विचार स्पष्ट करा. 16

2. छत्रपती शिवाजी महाराजांची पर्यावरण विषयक दूरदृष्टी 'आज्ञापत्रा'तून स्पष्ट करा.

**किंवा**

'माझे दत्तक वडील' या कथेत अण्णा फाटक यांनी लेखकाला कसे फसवले, त्याचे वर्णन करा ? 16

3. (अ) 'ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा।' या अभंगातून संत चोखामेळा यांनी कोणता विचार मांडला आहे ?

**किंवा**

'जातं' या कवितेचा आशय स्पष्ट करा. 8

(ब) 'अखेरकमाई' या कवितेत कुसुमाग्रजांनी समाजातील दांभिकतेवर कसे कोरडे ओढले आहेत ?

**किंवा**

'सात-बाराची नोंद' या कवितेत शेतकऱ्याची होणारी पिळवणूक कशी चित्रित केली आहे ? 8

4. (अ) उत्तम वक्ता होण्यासाठी पूर्वतयारी कशी करावी ?

**किंवा**

उत्तम वक्त्याच्या ठिकाणी स्मरणशक्ती आणि अवधानशक्ती का आवश्यक आहे ? 8

(ब) सूत्रसंचालकाकडे कोणकोणत्या गुणांची आवश्यकता असते ?

**किंवा**

सूत्रसंचालकाला मुलाखत घेण्यापूर्वी आणि मुलाखत घेताना कोणती काळजी घ्यावी लागते ? 8

5. योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा :

(1) 1142 च्या 'भारत छोडो' च्या आंदोलनात यशवंतरावांनी कोणत्या जिल्ह्याचे नेतृत्व केले ?

(अ) अमरावती  (ब) नासिक

(क) सातारा  (ड) कोल्हापूर

(2) नाना प्रकारची सुखं माणसाच्या पायांवर लोळण घेतात :

(अ) विद्वत्तेमुळे  (ब) ज्ञानामुळे

(क) पदामुळे  (ड) प्रतिष्ठेमुळे



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

(3) 'भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टी' हा लेख कोणी लिहिला ?

(अ) आ. ह. साळुंखे (ब) चिं. वि. जोशी

(क) दया पवार (ड) श्री. म. माटे

(4) मराठीत नातेवाईकाला काय म्हणतात ?

(अ) कुटुंब (ब) आप्त

(क) सगेसोयरे (ड) सहकारी

(5) 2 मे 1160 रोजी कुणाच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली ?

(अ) यशवंतराव चव्हाण (ब) बाळासाहेब खेर

(क) शंकरराव मोरे (ड) दत्ता देशमुख

(6) 'आज्ञापत्र' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(अ) आ. ह. साळुंखे (ब) यशवंतराव चव्हाण

(क) श्री. म. माटे (ड) रामचंद्रपंत अमात्य

(7) चि. चिमणरावास पत्र कोणी लिहिले ?

(अ) पासोडे महाराज (ब) अण्णा फाटक

(क) रामा (ड) आईसाहेब

(8) लेखक कोणत्या बंदरावर फेरफटका मारण्यास गेले होते ?

(अ) गोवा (ब) गणपती पुळे

(क) दापोली (ड) रत्नागिरी

(9) 'बलुतं' या आत्मकथनाचे लेखक कोण आहेत ?

(अ) दया पवार (ब) केशव मेश्राम

(क) नामदेव कांबळे (ड) यशवंत मनोहर

(10) दया पवारांना हायस्कूलमध्ये असताना ________ कमालीचं वेड लावलं.

(अ) कादंबरीनं (ब) कवितेनं

(क) नाटकानं (ड) वाचनानं

(11) 'देहासी विटाळ म्हणती सकळ। आत्मा तो निर्मळ शुद्धबुद्ध।।' हा अभंग कोणी लिहिला ?

(अ) संत सोयराबाई (ब) संत जनाबाई

(क) संत कान्होपात्रा (ड) संत बहिणाबाई

(12) कुसुमाग्रजांचे पूर्ण नाव काय ?

(अ) गो. वि. करंदीकर (ब) कृष्णाजी केशव दामले

(क) विष्णू वामन शिरवाडकर (ड) प्र. के. अत्रे



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

(13) 'पाखरे' या कवितेतून कशाची खंत व्यक्त झाली आहे ?

(अ) मानवतेची (ब) बंदिस्तपणाची

(क) अस्वस्थपणाची (ड) सामाजिक जाणिवेची

(14) बदलत्या संस्कृतीची जाणीव कोणत्या कवितेतून व्यक्त होते ?

(अ) जातं (ब) अखेरकमाई

(क) पाखरे (ड) शांतता

(15) सिद्धार्थ भगत यांनी कवितेचा कोणता प्रकार हाताळला ?

(अ) सुनीत (ब) दीर्घकाव्य

(क) गझल (ड) चारोकी

(16) ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा।

काय ________ वरलीया रंगा।।

(अ) पाहतोसी (ब) भुललासी

(क) मिळतोसी (ड) लावतोसी 16



http://www.sgbauonline.com/